**<u>प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (लोहमार्ग) न्यायालय, दौंड यांचे न्यायालयात.</u>**
<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६० व २६३ प्रमाणे समरी फौजदारी खटल्याचे विवरण</u>

**<u>सं. फौ. ख. क. २१९१/२०१६.</u>**
**<u>निशाणी : ३.</u>**

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडल्याची तारीख | : | ०३/०८/२०१८. |
| २. फिर्याद दाखल तारीख | : | ०३/०८/२०१८. |
| ३. फिर्यादीचे नांव | : | श्री. आण्णा रुपनर,<br>आर.पी.एफ. सोलापूर. |
| ४. आरोपीचे नांव | : | विजयकुमार तिरुपती कोळी, वय २५ वर्षे,<br>रा. अकोला, गुलबर्गा. |
| ५. गुन्हा कलम | : | कलम १४७ रेल्वे अधिनियम कायदा, १९८९. |

**<u>अपराधाचे विवरण –</u>**

दिनांक ०३/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही सोलापूर रेल्वे स्थानकावर उड्डानपुलाचा वापर न करता रेल्वे रुळ ओलांडत असतांना मिळून आलात व त्यानुसार तुम्ही कलम १४७ रेल्वे अधिनियम १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

**– <u>आरोपीचे प्रतिकथन</u> –**

प्र. १ : तुम्हांला दाखल केलेल्या फिर्यादीची नक्कल प्रत मिळाली काय?
उत्तर : होय.

प्र. २ : तुम्हांला वाचून दाखविलेल्या गुन्हयाचा तपशिल समजला आहे काय?
उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हांला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : नाही, मला गुन्हा कबूल नाही.

आरोपीची सही..............................

**समक्ष**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ०३/०८/२०१८.**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क. १**

मी शपथपूर्वक कथन करतो ते येणेप्रमाणे :

माझे नांव : श्री. संतोष अहिरवार,
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
राहण्याचे ठिकाण : सोलापूर.

**सरतपास सहा. सरकारी वकील श्री. एस. के. रब्बानी यांच्यामार्फत**

१. दिनांक ०३/०८/२०१८ रोजी फिर्यादी श्री. आण्णा रुपनर, आर.पी.एफ. सोलापूर यांनी फिर्याद दिली की, त्यांची डयुटी सोलापूर रेल्वे स्थानकावर होती. त्यावेळेस आरोपी सोलापूर रेल्वे स्थानकावर उड्डानपुलाचा वापर न करता रेल्वे रुळ ओलांडत असतांना मिळून आला. त्यानंतर त्यांनी आरोपीस पकडून माझेकडे आणले व लेखी फिर्याद दिली. आता मला ती फिर्याद दाखविली असून ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आता निशाणी ३ देण्यात आले. चौकशीअंती आरोपीने सोलापूर रेल्वे स्थानकावर उड्डानपुलाचा वापर न करता अनाधिकृतरित्या रेल्वे रुळ ओलांडलेचे निष्पन्न झाले. म्हणून मी आरोपीविरुद्ध कलम १४७ रेल्वे अधिनियमानुसार फिर्याद दाखल केली. आरोपी आज रोजी उपस्थित आहे. त्यास मी ओळखतो.

**उलटतपास आरोपीने नाकारला.**

२. फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,** **समक्ष,**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**
**दिनांक :०३/०८/२०१८.**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब.</u>**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र. १ | : | फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला काय ? |
| उत्तर | : | होय. |
| प्रश्न क्र. २ | : | श्री. संतोष अहिरवार (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दि. ०३/०८/२०१८ रोजी तुम्ही सोलापूर स्थानकावर उड्डानपुलाचा वापर न करता रेल्वे रुळ ओलांडत असतांना मिळून आले. याबाबत तुम्हांस काय सांगायचे आहे? |
| उत्तर | : | हे खोटे आहे. |
| प्रश्न क्र. ३ | : | सदर साक्षीदार तुमचेविरूध्द का साक्ष देतात? |
| उत्तर | : | मला माहित नाही. |
| प्रश्न क्र. ४ | : | तुम्हास स्वत:ला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे का ? |
| उत्तर | : | नही. |
| प्रश्न क्र. ५ | : | तुम्हास तुमचे बचावाकरीता साक्षीपुरावा दयावयाचा आहे काय ? |
| उत्तर | : | नाही. |
| प्रश्न क्र. ६ | : | सदर खटल्याबाबत तुम्हांस आणखी काही सांगावयाचे आहे काय ? |
| उत्तर | : | नाही. |

**समक्ष,**

आरोपीची सही

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ०३/०८/२०१८.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वरील तपासणी माझे समक्ष ऐकणेत व घेणेत आली असून आरोपीने दिलेला जबाब पूर्णपणे व सत्यतेने नोंदला गेलेला आहे.

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ०३/०८/२०१८.**

## — न्यायनिर्णय —
( पारित दिनांक ०३ ऑगस्ट, २०१८. )

१) आरोपीवर, सोलापूर रेल्वे स्थानकावर उड्डानपुलाचा वापर न करता रेल्वे रुळ ओलांडलेचा, आरोप ठेवणेत आलेला आहे.

२) फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणे —

दिनांक ०३/०८/२०१८ रोजी सकाळी सकाळी ११.०० वाजता दरम्यान आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावर उड्डानपुलाचा वापर न करता अनाधिकृतरित्या रेल्वे रुळ ओलांडत असतांना फिर्यादी श्री. आण्णा रुपनर, आर.पी.एफ. सोलापूर यांना मिळून आला.

३) अपराधाचे विवरण (नि.क्र.२) आरोपीस वाचून दाखविले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

४) माझेसमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणामिमांसहित निष्कर्ष देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. दिनांक ०३/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावर उड्डानपुलाचा वापर न करता अनधिकृतपणे रेल्वे रुळ ओलांडत असतांना मिळून आल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... होय. |
| २. आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

### ***का र ण मि मां सा***

५) **मुद्दा क्रमांक १ :—**

श्री. संतोष अहिरवार (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक ०३/०८/२०१८ रोजी सोलापूर स्थानकावर आरोपी हा उड्डानपुलाचा वापर न करता अनधिकृतपणे रेल्वे रुळ ओलांडत असताना फिर्यादी श्री. आण्णा रुपनर यांना मिळून आला व त्यांनी फिर्यादीची लेखी फिर्याद निशाणी ३ नोंदवून घेतली. तसेच सदर साक्षीदाराने साक्षीमध्ये पुढे असे सांगितले की, त्यांच्या चौकशीमध्ये आरोपीने अनाधिकृतरित्या सोलापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत असलेचे निष्पन्न झाले. म्हणून त्यांनी सदरची फिर्याद दाखल केली. आरोपीने रेल्वे रुळ ओलांडत असलेचे नाकारले आहे. परंतु त्याने त्याची रेल्वे

स्थानकावरील उपस्थिती नाकारलेली नाही. रेल्वे स्थानकाचे परिसरामध्ये नेमके कोणते कारणासाठी तो आलेला होता अगर त्याचेकडे प्लॅटफॉर्म तिकीट होते किंवा नव्हते या बाबतचे स्पष्टीकरण त्याने केलेले नाही. त्यामुळे त्याचेविरुद्ध उलटविचार करणेस वाव मिळतो. तसेच फिर्यादी व चौकशी अधिकारी यांना आरोपीस खोट्या प्रकरणात गुंतविण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. तसेच फिर्यादी व आरोपीमध्ये कोणत्याही प्रकारचे पूर्ववैमनस्य नाही. यावरुन चौकशी अधिका—याचे साक्षीवर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण आरोपीने अभिलेखावर आणलेले नाही. फक्त उटलतपासामध्ये रेल्वे रुळ ओलांडलेचे नाकारणे ही बाब त्याने रेल्वे रुळ ओलांडला नाही हे गृहीत धरणेस पुरेशी नाही. सबब मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, आरोपीने सोलापूर रेल्वे स्थानकावर उड्डानपुलाचा वापर न करता अनधिकृतपणे रेल्वे रुळ ओलांडून कलम १४७ रेल्वे अधिनियमनुसार अपराध केला म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

६) **<u>मुद्दा क्रमांक २:—</u>**

आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असून त्याचा हा पहिलाच गुन्हा आहे. त्याचेवर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच तो कुटुंबातील एकटाच कमावता पुरुष आहे. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केलेचे फिर्यादी पक्षाने सिध्द केलेले नाही. सदरील केसमधील कागदपत्र त्याने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिध्द करीत नाही. गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझे मते आरोपीस दया दाखविणे योग्य वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन सदर मुद्देचा निष्कर्ष देणेकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

आरोपीस, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये, कलम १४७ रेल्वे अधिनियम १९८९ या अपराधाखाली सिध्द दोषी ठरविणेत येत असून त्याने सदर अपराधासाठी रुपये ५००/— (एकूण पाचशे रुपये फक्त) दंड भरावा. दंड भरणेस कसूर केलेस चार दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

**सोलापूर.**
**दिनांक: ०३/०८/२०१८.**

**( पी. डी. सावंत )**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

” I affirm that the contents of this PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : S.K. Torane,
Court's Name : P. D. Sawant, J.M.F.C.Railway Court, Daund.
Date : 03.**08**.2018
Judgment signed by presiding officer on : 03.**08**.2018
Judgment uploaded on : 07.**08**.2018